जिल्हा परिषद सरळसेवा भरती- २०२३
आरोग्य सेवक पुरुष (५० टक्के हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी व इतरमधुन) गट-क या पदावर नियुक्ती बाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र आरोग्य/आस्था-३/ ७८९ /२०२६
दिनांक - २२/०७/२०२६

वाचा :- १. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा सेवा प्रवेश नियम १९६७ मधील परिशिष्ट-५ मधील (पंधरा)
२ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक- ०४/०६/२००३ ची अधिसुचना.
३. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः प्रानिमं १२२२/प्र क्र ५४/का.१३-अ दिनांक ४ मे, २०२२.
४. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण २०२२/प्र क्र ११/२०२२/आस्था-८ दिनांक १५ मे, २०२३.
५. जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात क्रमांक ०१/२०२३
६. आय बी पी एस कंपनी लि. यांचे कडुन प्राप्त निकाल दिनांक- २९/०८/२०२४
७. मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडील मंजूर गुणवत्ता यादी दिनांक- ०५/०९/२०२४
८. मा.अवर सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र. पदम-३१२४/प्र.क्र.२५२/आस्था-८, दिनांक- १५/१०/२०२४
९. मा.अवर सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण-२०२४/प्र.क्र.३३४/आस्था-८, दिनांक- ०२/१२/२०२४
१०. मा.अवर सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण-२१२४/प्र.क्र.३३४/आस्था-८, दिनांक- १२/०३/२०२५
११. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय वेपुर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९, दिनांक- ०२/०६/२०२५
१२.मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडील मंजूर अंतिम निवडसूची दिनांक- ०९/०६/२०२५
१३. दिनांक- १३/०६/२०२५ रोजीचे समुपदेशनाचे मंजूर इतिवृत्त.
१४. सामन्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दिनांक- २५/०१/२०२४
१५. ग्राम विकास व पंचायतराज विभागाकडील शासन पत्र दिनांक- ११/१२/२०२४ व दिनांक- २२/०१/२०२५
१६.मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडील मंजूर अतिरिक्त अंतिम निवडसूची दिनांक- १३/११/२०२५
१७.मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडील मंजूर अतिरिक्त अंतिम निवडसूची क्र.२ दिनांक- २४/०३/२०२६
१८.श्री.आसिफ एजाज सय्यद, यांचा दिनांक-२१/०४/२०२६ व १८/०५/२०२६ रोजीचे नकार पत्र व इमेल
१९.श्री.सुरेश प्रल्हाद राठोड, यांचा राजीनामा मंजूरी आदेश क्र. आरोग्य/आस्था-३/६००/२०२६, दिनांक- ०८/०५/२०२६

२०.श्री.किरण लक्ष्मण टेले, यांचा राजीनामा मंजूरी आदेश क्र. आरोग्य/आस्था-३/६३७/२०२६, दिनांक- ०८/०६/२०२६

२१.या कार्यालयाकडील आदेश क्र. आरोग्य/आस्था-३/ 780 /२०२६, दिनांक- 22/०७/२०२६

२२.उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील पत्र क्र. खेआ/पुनर्प/१७६/२०२४/का-१५, दिनांक- २६/०५/२०२६

२३.अध्यक्ष तथा सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (हिवताप) पुणे-६ यांचेकडील पत्र क्र. सहासंआसे/आस्था/श्री.घालमे व नागवे/५१३/२०२६, दिनांक- २३/०४/२०२६

संदर्भ क्रमांक १ ते ४ मधील महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील आदेशानुसार संदर्भ क्र.५ अन्वये जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत जिल्हा सेवा वर्ग-३ आरोग्य सेवक पुरुष (५० टक्के हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी व इतरमधुन) गट-क या पदासाठी सरळसेवा भरती जाहिरात देण्यात आलेली होती. संदर्भ क्रमांक ६ चे प्राप्त निकाल तसेच संदर्भ क्रमांक १२, १६ व १७ ची अंतिम केलेल्या निवडसुची. संदर्भ क्र. १८ नुसार श्री.सय्यद यांचा हजर होणेस नकार, १९ व २० नुसार मंजूर झालेले राजीनामा, संदर्भ क्र.२१ नुसार, नियुक्ती आदेश दिनांकापासून पदस्थापनेच्या ठिकाणी ३० दिवसांच्या आंत हजर न झालेल्या उमेदवारांची नियुक्ती रद्द केलेले व संदर्भ क्र.२२ नुसार, खेळाडू, संदर्भ क्र.२३ नुसार, हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी व संदर्भ क्र. २१ व २२ यांचे रिक्त पदावर गुणवत्तेने निवडीच्या प्रवर्गातील पुढील उमेदवार यांची जिल्हा परिषद सरळसेवा भरती २०२३ अंतर्गत संदर्भ क्रमांक १ व २ मधील तरतुदीनुसार आरोग्य सेवक पुरुष (५० टक्के हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी व इतरमधुन) गट-क या पदावर सुधारीत वेतन संरचना एस-९: २६४००-८३६०० या वेतनश्रेणीमध्ये (अधिक नियमानुसार देय भत्ते) स्थानापन्न नियुक्तीने त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात करणेत येत आहे.

| अ.क्र | सरळसेवेने नियुक्त केलेल्या उमेदवाराचे नाव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.असिफ एजाज सय्यद,<br>मु.पो.वाकड, ता.निफाड, जि.नाशिक<br>पिन कोड नं. ४२२३०५ | वि.जा.अ | वि.जा.अ (सर्वसाधारण) | उपकेंद्र-काकडी, प्रा.आ.केंद्र-पोहेगाव, ता.कोपरगाव |
| २ | श्री.प्रतिक बाळासो पाटील,<br>मु.शुभम हाईट, फ्लॅट नं.१६, झिल चौक, नऱ्हे, पुणे,<br>पिन कोड नं. ४११०४१ | भ.ज.क | खुला (सर्वसाधारण) | उपकेंद्र-वडनेर, प्रा.आ.केंद्र-निघोज, ता.पारनेर |
| ३ | श्री.स्वप्निल रामदास भोगावडे,<br>मु.कृष्णाई निवास, ओमसाई नगर, गोलेगांव रोड, ता.शिरुर, जि.पुणे<br>पिन कोड नं. ४१२२१० | इ.मा.व. | खुला (सर्वसाधारण) | उपकेंद्र-अरणगाव, प्रा.आ.केंद्र-वाळकी, ता.नगर |
| ४ | श्री.गणेश यल्लया चित्तंपेल्ली,<br>मु.पांडूरंग नगर, डीएसएम कॉलेज जवळ, जिंतूर रोड, परभणी, ता.जि.परभणी<br>पिन कोड नं. ४३१४०१ | भ.ज.ब | भ.ज.ब (सर्वसाधारण) | उपकेंद्र-रहिमपूर, प्रा.आ.केंद्र-निमगाव जाळी, ता.संगमनेर |
| ५ | श्री.अशिष गुलाब ताजणे,<br>मु.निवाली, पो.उकानी, ता.वणी, जि.यवतमाळ<br>पिन कोड नं. ४४५३०४ | इ.मा.व. | इ.मा.व. (सर्वसाधारण) | उपकेंद्र-खांबा, प्रा.आ.केंद्र-पेमगिरी/चंदनापुरी, ता.संगमनेर |

| अ.क्र | सरळसेवेने नियुक्त केलेल्या उमेदवाराचे नाव व पत्ता | जातीचा प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | |
| ६ | श्री.अजिंक्य केरभाऊ घोलप,<br>मु.पोंडेवाडी, पो.लखनगांव, ता.आंबेगांव, जि.पुणे<br>पिन कोड नं. ४१२४०६ | आ.दु.घ. | आ.दु.घ. (सर्वसाधारण) | उपकेंद्र-जांबुत, प्रा.आ.केंद्र-[illegible], ता.संगमनेर |
| ७ | श्री.अनिरुध्द रविंद्र जाधव,<br>मु.प्लॉट नं.१८, एबी पार्क पिंपराला, पिंपराला, ता.जि.जळगांव<br>पिन कोड नं. ४२५००१ | खुला | खुला (खेळाडू) | उपकेंद्र-मढी बु. प्रा.आ.केंद्र-पोहेगांव, ता.कोपरगांव |
| ८ | श्री.मोहन प्रकाश ढवळे,<br>मु.१९३७ वार्ड, गवळी गल्ली, शनिवार पेठ, ता.करवीर, जि.कोल्हापूर<br>पिन कोड नं. ४१६००२ | वि.मा.प्र. | खुला (खेळाडू) | उपकेंद्र-सोनई प्रा.आ.केंद्र-सोनई, ता.नेवासा |
| ९ | प्रकाश आनंदा गुंजाळ,<br>मु. घर नं.९, गल्ली नं.५ हेवन पार्क, मोहम्मदवाडी, वानवडी रोड, हडपसर, ता.हवेली, जि.पुणे<br>पिन कोड नं. ४११०६० | खुला | खुला (खेळाडू) | ता.आ.अ. कर्जत |
| १० | श्री.नितीन बाळासाहेब घालमे,<br>मु.वडगांव दरेकर, दौंड, ता.दौंड, जि.पुणे<br>पिन कोड नं. ४१३८०१ | खुला | खुला (सर्वसाधारण) | उपकेंद्र-चुंभळी प्रा.आ.केंद्र-नान्नज, ता.जामखेड |
| ११ | श्री.उमेश जालिंदर नागवे,<br>मु.वडगांव दरेकर, दौंड, ता.दौंड, जि.पुणे<br>पिन कोड नं. ४१३८०१ | इ.मा.व. | इ.मा.व. (सर्वसाधारण) | उपकेंद्र-बुऱ्हाणनगर प्रा.आ.केंद्र-[illegible], ता.नगर |

अटी व शर्ती -

१. आरोग्य सेवक पुरुष (५० टक्के हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी व इतरमधुन) गट-क या पदावर केलेली नेमणूक पुर्णतः हंगामी तात्पुरत्या स्वरुपाची असुन कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना व कारण न दाखवता जिल्हा परिषदेच्या सेवेतून कमी करण्याचा हक्क राखून ठेवला आहे. तसेच सदर नेमणुकीमुळे त्यांना यापुढे शासकीय नेमणुकीसाठी कोणताही हक्क प्रस्तापित करता येणार नाही.

२. सदर भरती प्रक्रियेतील नियुक्ती संदर्भात काही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास न्याय निर्णयाच्या अधिन राहुन नियुक्ती प्राधिकरणाने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

३. प्रथम नेमणुकीच्या ठिकाणी रुजु होणेसाठी कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च दिला जाणार नाही.

४. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ११ परिशिष्ट ३ मध्ये नमूद केल्यानुसार सदर पदावर रुजू झालेपासुन दोन महिन्याच्या आत जिल्हा शल्य चिकीत्सक अहमदनगर यांचेकडील शार्रिरिक दृष्टया पात्रते संबंधीचे वैदयकिय प्रमाणपत्र नेमणुकीचे कार्यालयास सादर केले पाहिजे. वैद्यकिय प्रमाणपत्र सादर न केल्यास अथवा वैद्यकियदृष्टया शासकीय सेवेस अपात्र ठरल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली नियुक्ती संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

५. महाराष्ट्र शासन साप्रवि कडील शा. नि. क्र चारित्र्य -२०१७/प्र क्र ४८३/२०१७/१६-अ दिनांक २८/०८/२०१७ अन्वये संबधित उमेदवारांनी नियुक्तीनंतर सहा महिन्यांच्या आत पोलिसांकडील चारित्र्य पडताळणी केली असले बाबतचा अनुकूल अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर चारित्र्याबाबतचा अहवाल सहा महिन्यांच्या आत संबंधित कार्यालयाकडून प्राप्त न झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता आपली नियुक्ती संपुष्टात आणनेत येईल याची नोंद घ्यावी.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम २०२१ नुसार उमेदवाराने नियुक्तीच्या वेळी खात्रीशीर कागदपत्र पुराव्यासह जन्म तारीख घोषीत करील. जेव्हा नियुक्तीची विहीत शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परिक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत, माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल, अन्य बाबतीत स्थानिक स्वराज्य संस्थेने निर्गमित केलेले जन्म प्रमाणपत्र किंवा ज्या शाळेत तो शेवटी शिकत होता, अशा मान्यताप्राप्त शाळेचे प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल. त्यानुसार उमेदवार जन्म तारखेचे परिशिष्ट-५ अ मध्ये हमीपत्र देईल. त्यानंतर खंड बी मध्ये विनिर्दीष्ट केल्याप्रमाणे शासकिय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीनंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

७. नेमणुक झालेल्या पदावरुन आंतरजिल्हा बदली करावयाची झाल्यास त्यासाठी शासन निर्णय दिनांक २९ सप्टेंबर २०११ मधील तरतुदीच्या व प्रचलीत शासन निर्णयाच्या अधीन राहुन तसा अर्ज आपणास प्रशासनाकडे करता येईल.

८. जिल्हा परिषद कार्यक्षेत्रात कोठेही बदलीस पात्र राहील. तसेच महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील दि.०५ जुलै २००८ चे शासन परिपत्रकानुसार नियुक्तीचे ठिकाणी राहणे बंधनकारक राहील, न राहील्यास शिस्तभंगाची कार्यवाहीस पात्र ठराल याची नोंद घ्यावी.

९. तुम्ही विवाहित असल्यास तुम्हास एकच पती / पत्नी आहे असे गृहित धरुन सदरची नियुक्ती देण्यात येत आहे. आपणास एकापेक्षा जास्त पती/पत्नी असलेचे निदर्शनास आल्यास आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

१०. खात्याच्या पूर्व परवानगीशिवाय प्रशिक्षण अगर शिक्षण घेता येणार नाही.

११. उमेदवाराने खाली दिलेल्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र भरुन या कार्यालयास नेमणुक करणेत आली आहे. त्यासंबंधि कार्यालय प्रमखांकडे दयावे लागेल.मी श्री./श्रीम. ------------------------राहणार---------- प्रतिज्ञापत्र लिहुन देतो की, जिल्हा परिषद सेवेत माझे जिल्हा सेवा वर्ग -३ आरोग्य सेवक पुरुष (५० टक्के हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी व इतरमधुन) गट-क या पदावर झालेली नियुक्ती हि वेतनबॅड एस-९: २६४००-८३६०० यामध्ये पुर्णपणे हंगामी स्वरुपाची असून आदेशातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे. व नेमणुक कोणतेही कारण अथवा नोटिस न देता संपुष्टात आणण्याचा जिल्हा परिषदेला पुर्ण अधिकार असून त्या अटीवर मी ही नेमणुक स्विकारीत आहे.

१२. सदर पदावर रुजू झालेनंतर काही अपरिहार्य कारणास्तव नोकरीचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी एक महिना अगोदर तशी नोटीस देणे आवश्यक आहे व नोटीस देणे शक्य नसेल तर नोटीसेपोटी एक महिन्याचा मूळ पगार जिल्हा फंडात भरावा लागेल.

१३. सदर नियुक्ती आदेश दिनांकापासुन पदस्थापनेच्या ठिकाणी ३० दिवसांच्या आत हजर होणे आपणास बंधनकारक राहिल अन्यथा सदरचा नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात येईल याची नोंद घ्यावी.

१४. सदर नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपणास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा नियम (सर्व) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन अधिसुचना/निर्णय/परिपत्रक यामधील तसेच वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी देतील अशा सर्व निर्देशाचे तंतोतंत पालन करणे उमेदवारास बंधनकारक राहिल.

१५. सदर प्रकरणी देणेत आलेली माहिती, प्रतिज्ञापत्रे यातील मजकुर खोटे असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची नेमणुक रद्द करणेत येईल व खोटे प्रतिज्ञापत्र करुन दिल्याबाबत संबंधिताविरुध्द नियमानुसार कार्यवाही करणेत येईल.

१६. सेवेत हजर झालेनंतर जिल्हा परिषद सेवा प्रवेशोत्तर परीक्षा लागु असलेस तशी परीक्षा /प्रशिक्षण विहित संधी कालावधीमध्ये पूर्ण करणे बंधनकारक राहिल, अन्यथा त्या पुढील वेतनवाढी / पदोन्नती आपणास अनुज्ञेय राहणार नाहीत.

१७. जिल्हा परिषद सेवेत असताना अगर रजेच्या मुदतीत कोणताही व्यवसाय, धंदा, अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.

१८. कार्यालय प्रमुखांना पुढील नामनिर्देशनपत्र देण्यात यावीत. १) गट विमा योजना २) वैदयकिय दाखला ३) जातीचा दाखला ४) जात वैधता प्रमाणपत्र ५) स्वग्राम घोषणा पत्र ६) शैक्षणिक व व्यवसायिक अर्हता ७) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र मुळ सेवा पुस्तक भरताना उपरोक्त कागदपत्रे डकविण्यात यावी ती डकविण्यात आली आहे किंवा नाही याची खात्री करुन घ्यावी.

१९. शासन मान्य संस्थांकडुन संगणक परिक्षा (एम.एस.सी.आय.टी.) नियुक्ती मिळाले पासुन दोन वर्षात उत्तीर्ण होणे अवश्यक आहे. अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल त्यानुसार खातेप्रमुख किंवा कार्यालय प्रमुख यांनी सदर कर्मचा-यास कार्यमुक्त करावे.

२०. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्र क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.०१/०७/२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणा-या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करणेसाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंब प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नियुक्तीसाठी अधिसुचनेत विहित केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे. त्याअनुषंगाने सदर नियमातील प्रतिज्ञापत्र नमुना अ नुसार उमेदवाराकडुन प्रतिज्ञापत्र कार्यालय प्रमुखाने भरुन घ्यावे सदर नियमानुसार दिनांक २८/०३/२००५ नंतर तिसरे अपत्य असणा-या उमेदवारची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२१. आपण मागासवर्गीय असल्यास शासन निर्णय दि.१२ डिसेंबर, २०११ नुसार आपणास नियुक्ती आदेशाच्या सहा महिन्याच्या आत जात पडताळणी समितीकडुन जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा आपली नियुक्ती रद्द केली जाईल.

२२. ज्या मागासवर्गीय उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातुन झालेली आहे. अशा उमेदवारांनाही त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि सदर उमेदवारांसाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेसाठी विशिष्ट कालमार्यादा असणार नाही.

२३. शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र.घभाम/१००५/प्र.क्र.४६३/पापु १६ दिनांक ८ जुन २००६ अन्वये शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करणेत आलेले आहे. त्यानुसार कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असलेबाबत व त्याचा वापर करीत असलेबाबत प्रमाणपत्र एका महिन्याच आत घ्यावे. शौचालयाची सुविधा नाही अथवा शौचालयाचा वापर करीत नाही त्यांचा घरभाडे भत्ता थांबविण्यात येईल.

२४. शासन वित्त विभाग क्रमांक अनियो/१००५/१२६/सेवा/४, दिनांक ३१/१०/२००५ अन्वये दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकिय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल.मात्र सद्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४ आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण / जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

२५. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र.रानियो-२०२२/प्र.क्र./३४/सेवा-४, दि.३१/०३/२०२३ अन्वये नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचा-यांचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यु उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतुन निवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवा निवृत्ती उपदान लागू होईल. त्याकरिता आपण शासन सेवेत नियुक्त आठ दिवसाच्या आत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

२६. आरोग्य सेवक पुरुष पदासाठी महाराष्ट्र शासनाच्या विभागीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आणि सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर यांचेकडून घेण्यात येणारे अभ्यासक्रम किंवा शासनाने समकक्ष ठरविलेले इतर संस्थेतील विहीत १२ महिन्यांचे मुलभूत प्रशिक्षण पुर्ण केले नसेल त्यांनी सदर प्रशिक्षण तीन संधीत पुर्ण करणे आवश्यक राहील.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेला असुन त्याचा सांकेतांक क्रमांक 202507022900903 असा आहे.

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.------------------------------------------ (सर्व संबंधित उमेदवार)

प्रत व व्दारा :- वैदयकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र --------------ता.------------------जिल्हा-अहिल्यानगर

२/-संबंधित नियमानुसार हजर करुन घेण्याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करावी. तसेच संबंधिताच्या सर्व मुळ कागदपत्रांची पडताळणी आपल्या स्तरावरुन करावी व त्यानंतरच संबंधीतास रिक्त पदावर हजर करुन घ्यावे. संबंधीताचा हजर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत - माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना

१. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

२. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर

३. गटविकास अधिकारी/तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती ------------- ता ------------

४. निवड नस्ती

(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर